नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २३३ Issue - 233 | वार सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ Blow- Monday Date 12 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ही शेवटची लढाई, त्वेषाने लढा, आज हरलात तर संपून जाल

## भाजपावर टीका करत राज ठाकरेंचं घणाघाती भाषण; मराठी माणसांना त्वेषाने पेटून उठण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचं लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकांसाठीची मुंबईतील सर्वात मोठी सभा आज शिवाजी पार्क मैदानावर पार पडली. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी सभेला संबोधित केले.

राज ठाकरेंनी आपल्या स्टाईलने भाषण करत मराठी माणसाला साद घातली, मराठी आणि मुंबईसाठी आलेलं संकट परतवून टाकायचं असल्याचे सांगत महापालिका निवडणुकीत शिवसेना-मनसे युतीच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले.

आपल्याला मुंबई वाचवायचीय, ही शेवटची लढाई, त्वेषाने लढा, आज हरलात तर संपून जाल, अशा शब्दात राज ठाकरेंनी मराठी माणस-ला विनंती केली, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह केंद्र सरकारवर हल्लाबोल केला.





काही जण तिकीट वाटपात नाराज झाले, त्यांची दिलगिरी व्यक्त करतो. आपलेच आहेत, परत येतील... आत्ताच आहे ते जातील. गेलेले तर परत येतीलच, असे म्हणत राज ठाकरेंनी पहिल्यांदाच जाहीर व्यासपीठावरुन दिलगिरी व्यक्त केली.

अख्खी मुंबई विकायला काढली आहे, २०२४लोकसभा निवडणुकीनंतर एका व्यक्तीने माहिती दिली, माझी रिसर्च टिम कामाला लागली. आत्ता हे सगळं मी तुम्हाला दाखवणार आहे. आता हे दाखवल्यानंतर तुम्हाला भीती नाही वाटली तर निवडणुका न लढवलेल्या बऱ्या, आपण डोळेझाक करून टाकतोय. मी २०१४ चा भार-ताचा मॅप दाखवतो असे म्हणत राज ठाकरेंनी लाव रे तो व्हिडिओ केला. त्यामध्ये, गौतम अदानींचे प्रोजेक्ट किती होते आणि नरेंद्र मोदी पंतप्रधान होण्याआधी आणि नंतर गौतम अद-ानी कुठे आहेत याची माहिती राज ठाकरेंनी दिली. तसेच, तुम्हाला नाही धक्का बसला तर बघा.. असेही ते म्हणाले.

हे फक्त १० वर्षातलं आहे, जगात कोणता व्यक्ती नसेल एवढा १० वर्षात श्रीमंत झाला, एकाच माणसाला एवढ्या गोष्टी दिल्या. जगातला २ नंबरचा सिमेंट उद्योगमध्ये मोठे झाले-ले अदानी आहेत. २०१४ आधी हा सिमेंट उद्योगात कुठेच नव्हता, चचठ रिजनमध्ये यांनी काय केलं ते मी वा-चून दाखवतो. तुम्हाला कळतंय काय चाललाय, असे म्हणत राज ठाकरेंनी अदानींच्या संपत्तीचा उल्लेख केला.

परवा उत्तर भारतातला कोणीतरी म्हणाला बीएमसी मध्ये उत्तर भारतीयांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजे, कोल्हापूर-सातारा ह्या बाहेरच्या लोकांना येथे नोकऱ्या नको म्हण-तात. कोल्हापूर, सातारामधले लोक तुम्हाला बाहेरचे लोक वाटतात. यांचा नेता कृपाशंकर सिंह म्हणतो उत्तर भारतीय महापौर बसेल, पण तुम्ही बोलू शकता का तिकडे जाऊन?

मुंबईत रसमलाई आली होती... म्हणतो मुंबई आणि महाराष्ट्राचा काय संबंध? भडव्या तुझा काय संबंध आहे येथे यायचा? अशा शब्दात राज ठाकरेंनी अण्णामलाईचा समाचार घेतला. बाळासाहेब ठाकरे म्हणायचे हटाव लुंगी बजाव पुंगी ते यासाठीच. आम्ही एकटे असलो तरी काफी आ-होत.

भाजप जे करताय ते अमर प्रेम आणि आम्ही जे करतोय लव्ह जिहाद, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपच्या एमआयएम आणि कॉंग्रेससोबतच्या युतीचा समाचार घेतला.

तसेच, हे सगळं अदानीकरण सुरु आहे. मेवाभाऊ हे काय सुरु आहे, मुंबईचा परत बॉम्बे करायचा यांचा डाव तर नाही ना? अण्णामलाई भाजपच्या मनातला काल बोलून गेला, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले.


# भारताने न्यूझीलंडचा ४ गडी राखून धुव्वा उडवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वडोदरा : कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने २०२६ या नवीन वर्षाची सुरुवात अत्यंत दिमाखद-ार पद्धतीने केली. वडोदऱ्याच्या बीसीए स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ गडी राखून धुव्वा उडवला. या विजयासोबतच भार-ताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली आहे.







**टीम इंडियाचा २०२६ चा श्रीगणेशा! किवींचा सुपडा साफ**

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडची सुरुवात अत्यंत दमदार झाली. सलामीवीर डेव्हॉन कॉनवे आणि हेन्री निकोल्स यांनी पहिल्या विकेटसाठी ११७ धावांची भागीदारी रचली. या भागीदारी दरम्यान दोघांनीही प्रत्येकी ६० चेंडूमध्ये आपापले अर्धशतक पूर्ण केले. अखेर ही जोडी हर्षित राणाने फोडली. त्याने हेन्री निकोल्सला माघारी धाडले. निकोल्सने ८ चौकारांच्या मदतीने ६९ चेंडूमध्ये ६२ धावांची खेळी केली. त्यानंतर हर्षितने डेव्हॉन कॉनवेलाही बाद करत न्यूझीलंडला दुहेरी धक्का दिला. कॉन्वेने ६ चौकार आणि १ षटकाराच्या साहाय्याने ६७ चेंडूमध्ये ५६ धावा केल्या.

२८व्या षटकात मोहम्मद सिराजने विल यंगचा बळी घेतला. यंगच्या बॅटमधून केवळ १२ धावा निघाल्या. त्यानंतर ३४व्या षटकात कुलदीप यादवने ग्लेन फिलिप्सला बाद केले. त्या क्षणी न्यूझीलंडचा स्कोर १७० धावांवर होता. ३८व्या षटकात प्रसिद्ध कृष्णाने मिचेल हे याला बोल्ड केले, त्याने फक्त १८ धावा केल्या. सह-ावा विकेट ४३व्या षटकात पडला, जेव्हा ब्रेसवेलला श्रेयस अय्यरने अचूक थ्रोवरून रनआउट केले. पुढच्याच षटकात सिराजने झॅक फोक्स/जॅक्रीला बोल्ड करत न्यूझीलंडच्या अडचणी वाढवल्या. ४८व्या षटकात न्यूझीलंडला सर्वात मोठा धक्का बसला, जेव्हा डॅरिल मिचेल ७१ चेंडूमध्ये ८४ धावांची शानदार खेळी करून बाद झाला. ज्यामुळे कीवी संघ ३०० चा टप्पा ओलांडू शकला.

**विराट कोहलीचं 'तुफान' अन् भार-ताचा विजय**

न्यूझीलंडने दिलेल्या ३०१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरुवात अत्यंत दमदार झाली. रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी सावध पण आत्मविश्वासपूर्ण खेळ करत डाव सावरला. रोहित लयीत दिसत होता; मात्र नवव्या षटकात तो आऊट झाला. रोहितच्या बॅटमधून २६ धावा निघाल्या, ज्यात दोन शानदार षटकार आणि तीन चौकारांचा समावेश होता. यानंतर विराट कोहली आणि शुभमन गिल यांनी डावाला वेग दिला. दोघांमध्ये शतकी भागीदारी झाली आणि या दरम्यान विराट कोहलीने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील २८ हजार धावा पूर्ण करत एक महत्त्वाचा टप्पा गाठला. शुभमन गिलनेही अर्धशतक साथ दिली, मात्र २७व्या षटकात तो बाद झाला. गिलने ५६ धावांची उपयुक्त खेळी केली.

त्यानंतर विराटला साथ देण्यासाठी श्रेयस अय्यर मैदानात आला. दोघांमध्ये ७७ धावांची महत्त्वाची भागीदारी झाली. मात्र विराट कोहली शतकाच्या उंबरठ्यावर असताना दुर्दैवाने बाद झाला. ४०व्या षटकात कोहलीचा डाव संपला, त्याने ९३ धावा करताना ८ चौकार आणि १ षटकार लगावला. यानंतर रवींद्र जडेजा स्वस्तात माघ-ारी परतला, त्याच्या बॅटमधून केवळ ४ धावा निघाल्या. पुढच्याच षटकात श्रेयस अय्यरही ४९ धावा करून बाद झाला. एकामागून एक पडलेल्या विकेट्समुळे सामना न्यूझीलंडच्या बाजूने झुकू लागला. मात्र याच क्षणी हर्षित राणाने २९धावांची धडाकेबाज खेळी करत भारताला पुन्हा सामन्यात परत आणले. अखेर केएल राहूलने टीम इंडियाचा विजय निश्चित केला, भारताने ६ गडी गमावून हे मोठे लक्ष्य पार केले.

# पुण्यात देवाभाऊंचा रोड शो, स्वागताच्या फटाक्यांनी इमारतीला आग; मोबाईल टॉवर जळून खाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात महापालिका निवडणुकांच्या प्रचाराचा धुरळा उडाला असून आज सर्वच राजकीय पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या जाहीर सभा होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकच्या गोदा-वरी काठावर सभा घेतल्यानंतर पुण्यात रोड शोसाठी दाखल झाले आहेत.





दुसरीकडे मुंबईत ठाकरे बंधूंची एकत्र जाहीर सभा होत आहे. त्यामुळे, मुंबईसह महाराष्ट्राचे लक्ष मुंबईकडे लाग-ले असतानाचा पुण्यात देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतासाठी उडवण्यात आलेल्या फटाक्यांमुळे आगीची घटना घडली. भोसरीत मुख्यमंत्र्यांचा रोड शो सुरु असताना ही आगीची घटना घडली, येथील एका इमारतीवर रोड- शो दरम्यान फटाके वाजवताना आग लागली होती.

पुण्यातील भोसरीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रोड शो सुरु असताना फटाक्यांमुळे एका इमारतीत आग लागल्याची घटना घडली. त्यानंतर, तात्काळ अग्निशमन दलाच्या गाड्यांनी घटनास्थळी धाव घेतली असून अग्निशमन दलाच्या जवनांकडून आग आटोक्यात आणण्यात आली.

सुदैवाने कुठलीही हानी झाली नसली तरी आगीच्या घटनेत इमारतीवरील मोबाईल टॉवर जळून खाक झाल्याचीही माहिती आहे. या घटनेनं परिसरात गोंधळ उडाला होता, तसेच काही वेळ भीतीचे वा-तावरण निर्माण झाल्याचं दिसून आलं.

दरम्यान, आपल्या रोड शो वेळी मुख्यमंत्री पिंपरी चिंचवड पोलिसांवर संतापल्याचं दिसून आलं. पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव नागरिकांना रोखण्यास दोर लावला होता, मात्र मुख्यमंत्र्यांनी पोलिसांकडून लावण्यात आलेला दोऱ्यांचा वेढा काढायला सांगितला.

**तपोवन आणि कुंभमेळ्यावरून विरोधकांना चपराक**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विरोधकांवर टीकास्त्र**

# दोन भाऊ येऊन गेले, पण त्यांना श्रीरामाची आठवणही झाली नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : 'काही लोक निवडणुकीपुरते नाशिकमध्ये येतात, त्यांना आम्ही 'निवडणूक पर्यटक' म्हणतो. नाशिकमध्ये आल्यावर ज्यांना प्रभू रामाची आठवण येत नाही, त्यांच्यात आता राम उरलेला नाही. लक्षात ठेवा, जो राम का नहीं, वो किसी काम का नहीं,' अशा तिखट शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर तोफ डागली. दि. ९ जानेवारी शुक्रवारी रोजी नाशिकमध्ये उद्धव आणि राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि गिरीश महाजनांवर टीका केली होती. तसेच 'नाशिकला दत्तक घेण-ारा बाप परत फिरकलाच नाही', अशा शब्दात राज ठाकरेंनी फडणवीसांवर निशाणा साधला होता. त्याला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकम ध्ये आणलेल्या ५७ हजार कोटींच्या गुंतवणुकीचा हिशोबच मांडला. भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ नाशिकच्या गोदा-घाट परिसरात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना फडणवीस बोलत होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात नाशिकसाठी केलेल्या कामांचा पाढा वाचला. 'मी नाशिक दत्तक घेतले होते आणि मी तक्रार केली नाही. कोविड काळात जेव्हा सगळे घरी बसले होते, तेव्हा तुमचा हा 'देवाभाऊ' रस्त्यावर उतरून काम करत होता,' असं म्हणत उद्धव ठाकरेंना टोला लगा-वला. 'नाशिकमध्ये ५७ हजार कोटींची गुंतवणूक आणली असून, एचएलआरची १२ हजार कोटींची गुंतवणूक लवकरच येत आहे. १० हजार कोटींचा रिंग रोड, विमानतळ विस्तारासाठी १२०० कोटी आणि शहर गुन्हेगार मुक्त करण्यासाठी ४ हजार ख कॅमेरे बसवणार आहे. रस्ते वारंवार खोदावे लागू नयेत म्हणून फायबर ऑप्टिक आणि पाईपलाईनचे काम एकाचवेळी पूर्ण करणार असल्याची फडणवीसांनी जाहीर केलं.

गोदावरी स्वच्छतेसाठी आम्ही २५०० कोटींची तरतूद केली आहे. कुणाला गंगेचं पाणी चालत नाही. मात्र, कुंभमेळ्याच्या अनुषंगाने आम्ही गोदावरी नदी इतकी स्वच्छ करू की राज ठाकरे यांना येथे येऊन डुबकी मारता येईल', असं म्हणत गोदावरी स्वच्छतेच्या ठाकरेंच्या आरोपावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं.

तपोवन प्रकरणावरून अफवा पसरवणाऱ्यांना फडणवीसांनी गुगल फोटो दाखवत चोख प्रत्युत्तर दिले. तसेच 'ज्यावेळी नाशिक महापालिकेत तुमची सत्ता होती. तुमचे महापौर हो-ते. त्यावेळी त्याच ५४ एकर जा-गेचा ठराव झाला', असं म्हणत राज ठाकरेंच्या टीकेला प्रतिउत्तर दिलं. 'तपोवनाची जागा खुलीच राहणार, त्याचा कोणताही कमर्शियल वापर होणार नाही,' असं त्यांनी स्पष्ट केलं. तसेच, कुंभमेळ्याच्या परंपरेवर टीका करणाऱ्यांना उत्तर देताना ते म्हणा-ले की, 'औरंगजेबालाही कुंभमेळा बंद करता आला नाही, तर तुम्ही काय करणार? कुंभमेळा ही आमची संस्कृती आहे आणि ती सुरूच रा-हील'.

महिला भगिनींना आश्वस्त करताना फडणवीस म्हणाले, 'जोपर्यंत तुमचा हा देवाभाऊ मुख्यमंत्री आहे, तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. आता आमचे लक्ष्य केवळ पैसे देणे नाही, तर बहिणींना 'लखपती दीदी' बनवण्याचे आहे. मी येथून पुढे नाशिकच्या आमदारांना रस्त्याबाबत माहिती विचारणार नाही, त्याची माहिती आमच्याकडे असते. आता विचारणार किती लाडक्या बहिणी लखपती दीदी झाल्या'.

## संपादकीय....

### भारताची निर्यातवाढ

अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्के आयात शुल्कामुळे भारतीय निर्यात दारांनी नवीन बाजारपेठा शोधण्यास सुरुवात केली आहे. अनेक नवे पर्याय भारतीय निर्यातदाऱ्यांना या दरम्यान उपलब्ध झाले आहे. युरोपिय देशातील भारताच्या निर्यातीत मोठी वाढ झाली आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, युरोपियन युनियनमधील २७ देशांमध्ये स्पेन, जर्मनी, बेल्जियम आणि पोलंड हे भारतीय वस्तूंसाठी प्रमुख निर्यात हब म्हणून उदयास येत आहेत. स्पेन हे भारतीय निर्यातीसाठी सर्वात वेगाने वाढणारी युरोपीय बाजारपेठ म्हणून समोर आले आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते नोव्हेंबर या काळात स्पेनला होणारी भारतीय निर्यात ५६ टक्क्यांहून अधिक वाढली आहे. या काळात स्पेनला झालेली निर्यात मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीतील ३ अब्ज डॉलर्सवरून वाढून ४.७ अब्ज डॉलर्स झाली आहे. भारताच्या एकूण निर्यातीत स्पेनचा वाटा २.४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे, ज्यात ०.५ टक्के अंकांची वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांत जर्मनीला होणारी भारताची निर्यात ९.३ टक्क्यांनी वाढून ६.८ अब्ज डॉलर्सवरून ७.५ अब्ज डॉलर्स झाली आहे. भारताच्या एकूण निर्यातीत २.६ टक्के वाटा आणि ०.२ टक्क्यांच्या हिस्सेदारी वाढीसह, जर्मनी भारतीय उत्पादनांसाठी स्थिर मागणी प्रदान करत आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. एप्रिल-नोव्हेंबर २०२५-२६ या काळात बेल्जियमला होणारी देशाची निर्यात ४.२ अब्ज डॉलर्सवरून वाढून ४.४ अब्ज डॉलर्स झाली आहे. याच कालावधीत पोलंडला भारताची निर्यात ७.६ टक्क्यांनी वाढून १.८२ अब्ज डॉलर्स झाली आहे, तर एप्रिल-नोव्हेंबर २०२४ मध्ये ती १.६९ अब्ज डॉलर्स होती. एकूण, हे कल युरोपसाठी भारताच्या निर्यात धोरणाचे प्रतिबिंब आहेत, असे अधिकाऱ्याने नमूद केले. स्पेनमध्ये वेगाने वाढणारी मागणी, जर्मनीमध्ये स्थिर वाढ आणि बेल्जियममधील स्थिरता हे दर्शवते की भारताची निर्यात संतुलित आहे, ज्यामध्ये जुन्या बाजारपेठांमध्ये मजबुती आणि नवीन बाजारपेठांमध्ये निर्यात वाढ दोन्ही घटक समाविष्ट आहेत.

# मिरजगी येथील श्री सिद्धरामेश्वर यात्रेस प्रारंभ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुक्यातील मिरजगी येथील ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर यात्रा महोत्सव १० जानेवारी पासून दीपोत्सवाने सुरुवात करण्यात आले असून १४ जानेवारी पर्यंत पाच दिवस विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले असल्यांची माहिती श्री सिध्दरामेश्वर देवस्थान पंच कमिटी सदस्य हावण्णा रामकृष्ण निंबाळ यांनी दिली आहे.

मंगळवार दि.१३ रोजी दिवसभर भक्ताचे घरापासून देवास्थान पर्यंत साष्टांग दंडवत घालून नवस फेडण्याचे कार्यक्रम होईल. रात्री आठ वाजता देवस्थान आवती भवती श्रीचे पालखी प्रदक्षिणा आणि शस्त्र चढविण्याचा कार्यक्रम होईल. रात्री १० वाजता मातृ बिद्दीतू मौन गेद्दीतू या सुंदर सामाजिक कन्नड नाटकाचे प्रयोग सादर होणार असल्यांची माहिती श्री सिध्दरामेश्वर देवस्थान पंच कमिटी सदस्य राम अम सिद्ध पाटील यांनी दिली आहे.

बुधुवार दि.१४ रोजी पहाटे श्रीचे महाभिषेक पूजा कार्यक्रम होणार आहे. सकाळी ११ वाजता महादेव निंबाळ लिखित श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर महाराज चरित्रामृत मिरजगी या पुस्तकाचे श्री वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थान अध्यक्ष तथा नूतन नगरसेवक महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थित सोलापूर वालचंद महाविद्यालय मराठी विभाग प्रमुख डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या शुभ हस्ते प्रकाशन कार्यक्रम होणार आहे. दिवसभर नवस फेडण्याचे कार्यक्रम होईल. देवास्थान समोरील होम यज्ञाचा शुभारंभ संजय देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.रात्री ११ वाजता प्रसिध्द कन्नड नाटकाचे प्रयोग सादर होणार आहे.तरी भाविक भक्तांनी श्रीचे दर्शन आणि महाप्रसादचे लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सिध्दरामेश्वर देवस्थान पंच कमिटी सदस्य मलकारी यलप्पा निंबाळ आणि बंडप्पा सिद्धप्पा निंबाळ यांनी केला आहे.

### श्रीचे पालखी भेटी व अक्षता सोहळा

**बुधवार दि.१४ रोजी सायंकाळी पाच वाजता मिरजगी येथील बोरी नदी पात्रातील (पाटबंधारे) जवळ बासलेगावं मिरजगी आणि गळोरगी या तिन्ही गावातून श्री सिध्दरामेश्वर पालखीचे गंगास्नान येतात आणि बसवण कट्ट्याजवळ दिवस मावळण्याचा सुमारास या तिन्ही श्रीचे पालखी भेटीचे कार्यक्रम मोठया उत्सहात साजरी करण्यात येणार आहे .येथून या तिन्ही गावातील श्रीचे पालखी मिरजगी येथील श्री सिध्दरामेश्वर मंदिरा पर्यंत नंदीध्वजसह विविध वाद्यवृंदासह शोभेचे दारुकामचे आतेशबाजी करीत परंपरा प्रमाणे भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. श्री हनुमान मंदिराजवळ नंदीध्वजास फुल चढविण्याचा कार्यक्रम होणार आहे. पुरंवत स्वामीचे शस्त्र खेळण्याचे कार्यक्रम होणार असून रात्री आठ वाजता अक्षता सोहळा कार्यक्रम होणार आहे.**

**– सौ रकमाबाई लक्ष्मण निंबाळ**
**सरपंच ग्रामपंचायत मिरजगी**

# केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी पत्रकारांसाठी अनौपचारिक स्नेहभोजन केले आयोजित

नवी दिल्ली : विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान विभागाचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तसेच पंतप्रधान कार्यालय, अणुऊर्जा विभाग, अंतराळ विभाग, कार्मिक, सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्ती वेतन विभागाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आज नवी दिल्ली येथील आपल्या निवासस्थानी पत्रकार आणि माध्यम प्रतिनिधींसाठी एका अनौपचारिक स्नेहभोजन आयोजित केले होते.

या स्नेहभोजनामुळे विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासकीय सुधारणा आणि राष्ट्रीय विकासाशी संबंधित विविध समकालीन विषयांवर मनमोकळा संवाद साधण्याची तसेच विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली. यावेळी मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील पत्रकारांनी आपले दृष्टिकोन मांडले आणि धोरणात्मक उपक्रम तसेच सार्वजनिक हिताच्या उदयोन्मुख क्षेत्रांवर अनौपचारिक अभिप्राय मांडला.

या संवादादरम्यान, डॉ. जितेंद्र सिंह यांनी 'शांती कायद्या'शी संबंधित विविध पैलू, भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणामध्ये स्मॉल मॉड्युलर रिक्टर्सची (डचठी) भूमिका तसेच देशभरातील विविध ठिकाणी येऊ घातलेल्या अणुऊर्जा प्रकल्पांची स्थिती अशा प्रमुख कायदेशीर आणि धोरणात्मक घडामोडींवर चर्चा केली. हवामानविषयक उद्दिष्टे साध्य करताना भारताची दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यात अणुऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावत राहील, यावर त्यांनी भर दिला.



विज्ञान सुधारणांची व्याप्ती आणि प्रमाण वाढत आहे, तर प्रशासकीय सुधारणा अधिकाधिक तंत्रज्ञान-आधारित होत आहेत, असे सरकारच्या सुधारणा अजेंड्यावर प्रकाश टाकताना मंत्र्यांनी सांगितले. तंत्रज्ञान पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिक-केंद्रित प्रशासनात सरकार कशी सुधारणा करत आहे, याचे उदाहरण म्हणून मंत्र्यांनी केंद्रीकृत सार्वजनिक तक्रार निवारण आणि देखरेख प्रणाली (सीपीजीआरएएमएस) सारख्या डिजिटल व्यासपीठाचा उल्लेख केला. भारतीय प्रशासकीय आणि डिजिटल प्रशासकीय प्रारुपाचा अभ्यास करण्यासाठी येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांची वाढती संख्या हे भारताच्या प्रशासकीय नवोन्मेषात वाढत्या आंतरराष्ट्रीय स्वारस्याचे निर्देशक असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. जितेंद्र सिंह यांनी प्रमुख नागरिक-केंद्रित उपक्रमांबद्दलही माहिती दिली. मंत्र्यांनी डिजिटल जीवन प्रमाणपत्र (डीएलसी) मोहिमेबाबतही सांगितले. या मोहिमेमुळे निवृत्तीवेतनधारकांसाठी प्रक्रिया लक्षणीयरीत्या सुलभ झाली असून जीवन सुलभता आणि कार्य सुलभता सुधारण्याच्या उद्देशाने केलेल्या इतर डिजिटल सुधारणांबाबतही त्यांनी माहिती दिली. हे उपक्रम सर्वसमावेशक आणि कार्यक्षम प्रशासनासाठी तंत्रज्ञानाचा लाभ घेण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहेत, हे त्यांनी अधोरेखित केले.

या संपूर्ण संवादादरम्यान, डॉ. जितेंद्र सिंह यांनी माध्यमांशी सतत संवाद साधण्याच्या महत्त्वावर भर दिला तसेच पत्रकार हे जटिल धोरणात्मक उपक्रम आणि वैज्ञानिक यश लोकांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाचे भागीदार असल्याचे त्यांनी सांगितले. माहितीपूर्ण सार्वजनिक संवाद आणि विधायक अभिप्राय वाढविण्यात माध्यमांच्या भूमिकेचे त्यांनी कौतुक केले.

हे स्नेहभोजन खुल्या संवादाच्या आणि परस्पर कौतुकाच्या वातावरणात संपन्न झाले, ज्यामुळे माहितीपूर्ण चर्चा, पारदर्शकता आणि सहकार्याच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी सरकार आणि प्रसारमाध्यमे यांच्या सामायिक वचनबद्धतेची पुष्टी झाली.



# पुणे ग्रँड टूर २०२६ आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेमुळे पुरंदर पर्यटनाला मिळणार जागतिक ओळख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुणे ग्रँड टूर-२०२६' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेमुळे पुणे जिल्ह्यासोबतच पुरंदर तालुक्याच्या पर्यटन क्षेत्राला जागतिक पातळीवर नवी ओळख मिळणार आहे. चाळीस देशांमध्ये या स्पर्धे चे थेट प्रक्षेपण होणार असून पुरंदर तालुक्यासह जिल्ह्यातील निसर्ग, किल्ले, सांस्कृतिक वारसा व ग्रामीण सौंदर्य जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे. या स्पर्धेमुळे पुण्याचा इतिहासात नवीन अध्याय लिहिला जात असून यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

जिल्हाधिकारी डुडी यांनी 'बजाज पुणे ग्रँड टूर-२०२६' मधील टप्पा क्रमांक ३ च्या मार्गाची पाहणी करत स्पर्धा मार्गातील नागरिक व सासवड परिसरातील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी माजी आमदार संजय जगताप, सासवड नगराध्यक्षा आनंदी काकी जगताप, उपविभागीय अधीकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र गौर, सार्वजनिक बांधकाम अनुराधा भंडारी, कृषि अधिकारी श्रीधर चव्हाण, वनधिकारी सागर ढोले, पोलीस निरीक्षक कुमार कदम, क्रीडा शिक्षक निलेश जगताप, सार्वजनिक बांधकाम अधिकारी प्रकाश निगडे,पुरंदर तालुक्यातील सर्व पोलीस पाटील बंधू भगिनी, सरपंच, उपसरपंच, अंगणवाडी सेविका,प्राध्यापक व विद्यार्थी,पत्रकार बांधव आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, चॅनलद्वारे थेट प्रक्षेपणामुळे जिल्ह्यातील नैसर्गिक सौंदर्य, किल्ले, धार्मिक पर्यटनस्थळे,

ग्रामीण परंपरा व इतिहास जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचणार आहेत. या माध्यमातून ग्रामीण पर्यटनाला चालना मिळून युवकांसाठी रोजगार व स्थानिकांसाठी नवीन आर्थिक संधी उपलब्ध होतील. पुण्याची सायकलीचे शहर म्हणून असलेली ऐतिहासिक ओळख पुनर्जीवित करण्यासोबतच नागरिकांमध्ये आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार प्रोत्साहन आणि पर्यावरण संरक्षणासाठी सायकलचा आधार मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

स्पर्धा मार्गावर स्वच्छता, नियोजन व शिस्तबद्ध वर्तनाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक लोकप्रतिनिधी,

गणेश मंडळे, महाविद्यालये, एनसीसी, एनएसएस, क्रीडा संघटना यांनी संयुक्तपणे स्वच्छता मोहीम व स्वागत सोहळे आयोजित करावेत असेही त्यांनी सांगितले. यावेळी क्रीडा संकुलातील उत्कृष्ट खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या स्पर्धेचा टप्पा-३ दिनांक २२ जानेवारी रोजी सासवड येथील चंदन टेकडीपासून सुरू होऊन सुपे, पानवडी घाट, काळदरी, मांदर, माहूर, पिसुटर्टी, नीय, मोरगावमार्गे बारामती येथे समाप्त होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सासवड नगरपालिकेचे मुख्यधिकारी कैलास चव्हाण यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# विशेष लेख : श्री गुरु तेग बहादुर – 'हिंद दी चादर'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल १६२१ – नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

एप्रिल १६२१ मध्ये अमृतसरमध्ये श्री गुरू तेग बहादूर यांचा जन्म वडील गुरू हरगोबिंद आणि माता गुजरी यांच्या कुटुंबात झाला. १६६४ मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली तर त्यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांनाही गुरु पदवी प्राप्त झाली होती. गुरू तेग बहादूर यांचे मूळ नाव त्यागमल होते. बालपणी एका युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना तेग बहादूर म्हणजेच तलवारीसारखा धैर्यवान हे नाव दिले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी मोठे भाग्य, संपत्ती, मान नाकारत आनंदपूर साहिब येथे ध्यान आणि सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले. धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा देत असताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरूंगात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी ध्यान करत, ईश्वराचे स्मरण करण्यास प्राधान्य दिले.




मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरूतेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांची अनेक भक्तिगीते गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ स्थापन केले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची जयंती देशभरात श्रद्धेने साजरी केली जाते. केंद्र शासनाने २०२२ मध्ये त्यांची ४०० वी जयंती देशभर साजरी केली होती.

त्यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या सर्व रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात आहेत.

'जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै,
सुख सनेहु अरू भय नहीं जा कै, कांचन माटी मानै,
लोभ मोह अभिमान न ता कै, हरख सोग नहीं जा कै
जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै'

म्हणजेच जो मनुष्य दु:खात असला तरी दु:खी होत नाही, जो सुखात असला तरी अहंकार करत नाही, ज्याच्यासाठी सोने आणि माती समान आहेत, जो लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त आहे तोच खरा ज्ञानी आहे. अशा अनेक भावपूर्ण आणि मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या रचना त्यांनी केल्या आहेत.

त्यांच्या शहीद समागमास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अल्पसंख्यांक विभाग आणि श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

नुकत्याच या कार्यक्रमांच्या आयोजनानिमित्त कार्यशाळा घेण्यात आली होती. यावेळी 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब' यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेनिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले होते आणि हा कार्यक्रम जनमानसांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती आणि शासन एकत्रितरित्या काम करीत आहे. त्यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी आहे. तसेच, तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या अदाकारीचे वागदरीकरांनी केले कौतुक

## सांस्कृतिक कार्यक्रमातून केले प्रबोधन आणि मनोरंजन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : हिंदी, मराठी व कन्नड भाषेतील सुरेल देशभक्तीची गाणी, भक्ती गीते, बेहतरीन डान्स त्यातून वाद्याचा अविष्कार यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये कलाकृतीचा रंग भरला होता. कलाकारांच्या गायन, नृत्य, वादन कार्यक्रमास वागदरीतील रसिकांनी मनमुराद दाद दिली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक देखील केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर वागदरी येथे सुरू आहे. शिबिराच्या निमित्ताने नागरिकांचे प्रबोधन व्हावे म्हणून स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. प्रारंभी रंगमंच पूजा कमलाकर सोनकांबळे यांचे हस्ते झाले. यावेळी रमेश मंगाणे, परमेश्वर शेळके, शाम बाबर, महादेव सोनकवडे, बापूसाहेब चव्हाण, ज्योती सावंत उपस्थित होते.

स्वयंसेवकांनी कार्यक्रमांमधून लोककला, नृत्य, संगीत, नाटक, काव्यवाचन, भारुड, पोवाडा यांसारख्या विविध कला प्रकारांचे सादरीकरण केले. सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोचविण्याचे कार्य देखील केले.

सांस्कृतिक कार्यक्रम हे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून समाजप्रबोधनाचेही प्रभावी साधन आहे. अनेक वेळा सामाजिक समस्या, स्त्री–पुरुष समानता, पर्यावरण संवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन यांसारखे विषय कलात्मक पद्धतीने स्वयंसेवकांनी मांडले . यामुळे प्रेक्षकांवर सकारात्मक परिणाम झाला, त्यातून विचारप्रवृत्तीला चालना मिळाली.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी असा संस्कृतिक कार्यक्रम उपयुक्त ठरते. आत्मविश्वास, संघभावना, नेतृत्वगुण आणि सर्जनशीलता विकसित करण्यास अशा उपक्रमांची मदत होते. असे यावेळी प्रमुख ग्रामस्थ संयोजक बापूजी चव्हाण यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

सांस्कृतिक कार्यक्रम समाजाला एकत्र बांधणारे, परंपरा जपणारे आणि नव्या विचारांना प्रोत्साहन देणारे असतात. सामाजिक सलोखा वाढवणे, विविधतेत एकता साधणे हा कार्यक्रमाचा उद्देश असतो असे शेवटी कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी बहुसंख्य ग्रामस्थ, महिला, बालगोपाळ उपस्थित होते.

सूत्रसंचलन समर्थ पवार यांनी केले उपस्थितांचे आभार कु प्रणाली थोरात यांनी मानले.

---

# श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचा इलेमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा १००% निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य कला संचालनालय, यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या चित्रकला ग्रेड परीक्षा या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा त्यांना इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत गुण वाढीसाठी त्याचा लाभ मिळावा यासाठी या परीक्षा शासनामार्फत घेतल्या जातात . परवा झालेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेत तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा एलिमेंट्री चित्रकला ग्रेड परीक्षा व इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी १००% लागलेला आहे.

एलिमेंट्री परीक्षेसाठी एकूण ३२ विद्यार्थी प्रविष्ट होते. उत्तीर्ण विद्यार्थी – ३२

श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी –१८

इ श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी – १४

इंटरमिजिएट परीक्षेस बसलेले विद्यार्थी –०४

उत्तीर्ण विद्यार्थी–०४

श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी – ०१

उ श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी –०३

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक श्री पांचाळ सर, श्रीमती रत्नपारखी मॅडम यांचे संस्थेच्या वतीने व विद्यालयाच्या वतीने विद्यालयाचे प्राचार्य श्रीमान घोडके सर यांनी अभिनंदन केले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

---

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय स्वीय सहाय्यक अमोल पाटणकर यांचे बंधू भाविन्य पाटणकर यांनी घेतले सूर्यनारायणाचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे असणाऱ्या सूर्यनारायण देवाची यात्रा मोठ्या उत्साहात सुरू असून ही यात्रा संपूर्ण महिनाभर चालते यात पौष महिन्यातील प्रत्येक रविवारी येते संपूर्ण जिल्ह्यासह राज्यातून हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात.

येथील सूर्यनारायणाचे मंदिर अतिशय प्राचीन असून पुरातन हेमाडपंथी असे दुर्मिळ मंदिर आहे. महाराष्ट्रातील एकमेव असे सूर्यनारायण देवाचे मंदिर आहे. आण्विक पाटणकर हे पंढरपूर येथे देवदर्शनासाठी आले असता त्यांना या मंदिराची माहिती मिळताच पाटणकर यांनी सूर्यनारायण मंदिरात जाऊन सूर्यनारायण देवाचे आशीर्वाद घेतले .यावेळी त्यांनी संपूर्ण मंदिराविषयीची माहिती जाणून घेतली यावेळी सूर्यनारायण देवस्थान ट्रस्ट व ग्राम प्रशासनाच्या वतीने त्यांचा सत्कार देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्राध्यापक दत्तात्रय मस्के, व ग्रामपंचायतचे उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी भाजपा पश्चिम महाराष्ट्र किसान मोर्चाचे अध्यक्ष माऊली हळणवर, भाजपा पंढरपूर तालुका सरचिटणीस विजयकुमार मोरे, महादेव केदारे, सचिन टिळेकर, महेश धुमाळ, तंटामुक्त अध्यक्ष विजय कोळेकर, सौरभ लक्ष्मण धनवडे, युवक नेते पंकज देवकते, वैजनाथ मस्के, माजी सरपंच



नितीन मस्के, पत्रकार मारुती वाघमोडे, पत्रकार तानाजी सुपकर, श्रीधर कोळेकर शिवाजी वसेकर, बाबासाहेब मुलांनी ,चंद्रकांत पाटील, नारायण गुंड, रमेश नाझरकर, अमोल गुंड, साधू नलवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

---



# दिव्या गोष्टे डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील तळवली येथे राहणाऱ्या खाणिवली कृषी तंत्र विद्यालयातील माजी विद्यार्थिनी कु. दिव्या रमेश गोष्टे यांना डॉ. पंजाबराव देशमुख जयंती निमित्त भारतीय कृषक समाज महाराष्ट्र राज्याच्या वतीने कु. दिव्या रमेश गोष्टे यांना

डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सेद्रीय किटक नाशके खते व गांडूळ खत निर्मिती तसेच महिला बचत गट यानं सेद्रीय शेती विषयक जनजागृती करण्यात आली आहे.म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख जयंती निमित्त डॉ. पंजाबराव

देशमुख कृषिरत्न पुरस्कार मिळाला प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्र हा कृषी क्षेत्रात अग्रेसर आहे. राज्यातील शेतकरी विविध पद्धतींचा वापर करून शेती करत असतात. त्यांचा सन्मान करण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार देण्यात येतो. डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार हा कृषी विभागामार्फत कृषी क्षेत्रात संघटनात्मक, तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना किंवा गटाला देण्यात येतो. हा पुरस्कार कृषी क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. पुरस्कार मिळाल्याबद्दल दिव्या गोष्टे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

# सिताराम सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव काळुंगे यांनी घेतले सूर्यनारायणाचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे पुरातन हेमाडपंथी असलेल्या सूर्यनारायण देवाची यात्रा मोठ्या उसात सुरू असून या यात्रेसाठी संपूर्ण राज्यातून हजारो भावीक पौष महिन्यामध्ये दर्शनासाठी येत असतात.

पौष महिन्यातील प्रत्येक रविवारी मोठ्या उसात ही यात्रा भरते या यात्रा काळात संपूर्ण महिनाभर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते याचे औचित्य साधत सिताराम सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव काळुंगे सर यांनी सूर्यनारायण देवाची विधिवत पाद्य पूजा करत आशीर्वाद घेतले.

यावेळी पूर्व भागाचे नेते महादेव देठे, अविनाश चव्हाण, पुजारी गणेश आवताडे, ट्रस्टचे संचालक आप्पासाहेब वाघमोडे, पप्पू मस्के, योगीराज वाघमोडे, बालाजी पांढरे, बाबासाहेब मुलानी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी चेअरमन शिवाजीराव काळुंगे सर यांचा सत्कार सूर्यनारायण देव ट्रस्ट व ग्राम प्रशासनाच्या वतीने उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण, व ट्रस्टचे अध्यक्ष दत्तात्रय मस्के यांच्या हस्ते करण्यात आला.

**नारायण चिंचोली येथील तीर्थक्षेत्र सूर्यनारायण देवाची यात्रा सुरू असून यात्रेनिमित्त पौष महिन्याचे औचित्य साधत तिसऱ्या रविवारी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक समाधान काळे, विठ्ठलचे माजी संचालक युवराजदादा पाटील, पंढरपूर ग्रामीणच्या पी.आय. घनवट मॅडम, सोलापूर चे पोलीस हवालदार चौगुले साहेब आदी प्रमुख मान्यवरांनी सूर्यनारायणाचे दर्शन घेतले.**

---

## गोपाल बोरकर यांचे प्रतिपादन : येरंडी येथे तमाशाचे थाटात उद्‌घाटन

# मर्दाच्या तमाशातुनच खरे सामाजिक प्रबोधन घडते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : भारतीय लोककला जीवंत ठेवण्यासाठी नागरिकांनी लोककला जपणे आवश्यक आहे. माणूस कलेचा कलाकार म्हणून सामाजिक प्रबोधन करतो. अशातच तमाशा हा फार प्राचीन काळापासून प्रबोधनाचा वसा जपतो आहे. म्हणून मर्दाच्या तमाशातुनच खरे सामाजिक प्रबोधन घडते. असे प्रतिपादन गोपाल बोरकर यांनी केले. ते कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर सेवानिवृत्त तहसीलदार मुनेश्वर गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, चंद्रशेखर ठवरे, आनंद चंद्रीकापुरे, रवी रणदिवे, प्रशांत मेश्राम, सुशील रामटेके, भवेश तागडे, विश्लेष मेश्राम,



गौतम रामटेके, सुरेश खोब्रागडे, दिपक कुंभरे, निशिकांत तागडे, विकास चवरे, नंदेश्वर रामटेके, देवला कोवे, मंगला नैताम, श्रिमती रंगारी, जयकांत गेडाम, भुपाल गेडाम, उमेश बोरकर, मयुर खोब्रागडे, बुद्धरत्न रामटेके, विवेक रामटेके, उमेश मेश्राम, आदी मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा या महापुरुषांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गोपाल बोरकर यांचा मंडळाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मंचावरील अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. संचालन संगम नंदागवळी यांनी करून आभार कमलेश ब्राम्हणकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कैलास ईस्कापे, विशाल गेडाम, दिपक तागडे, रोहित रामटेके, हनवत तागडे, दिनेश नंदागवळी, संदीप नंदागवळी, संदीप पंधरे देवेंद्र बोरकर प्रकाश शेंडे, नरेंद्र गणवीर अजिंक्य लोणारे यांनी परिश्रम घेतले.

# आरोग्य विभागाअंतर्गत बदल्या, पदोन्नतीसाठी 'एसएचएसआरसी'चे मूल्यांकन प्रमाण मानावे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नती करताना 'राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र' (एसएचएसआरसी) च्या प्रणालीनुसार कामगिरीवर आधारित मूल्यांकन अहवालानुसार पारदर्शकपणे कार्यवाही करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. या संदर्भात परिषद सभागृह, मंत्रालय येथे नवीन तांत्रिक कोर्सेस, नवीन प्रशिक्षणांचे नियोजन, वैद्यकीय अधिकारी, नर्सेस आणि तांत्रिक कर्मचारी यांचे परराज्यात, परदेशातील शैक्षणिक दौऱ्यांचे नियोजन, नवीन प्रशिक्षण नियोजन, सेवानिवृत्त संचालक, आरोग्य सेवा यांनी केलेल्या दौऱ्यातील निरीक्षण त्या अनुसार करावयाची कार्यवाही, 'एसएचएसआरसी' च्या जागेचे नूतनीकरण, पदभरती सद्यस्थिती, डक्ळठउ निधी उपलब्धता आदी विषयांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी या सूचना करण्यात आल्या. केंद्र सरकारची 'राष्ट्रीय आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र (एनएचएसआरसी) नवी दिल्ली' ही संस्था देश पातळीवर आरोग्य विभागास तांत्रिक सहकार्य करते. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात 'राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे' ही संस्था कार्यरत आहे. राज्याच्या आरोग्य विभागाची गुणवत्ता वाढ, आरोग्यविषयक संशोधन व तांत्रिक सहकार्य या संस्थेच्या वतीने देण्यात येते. आरोग्य विभागामार्फत एसएचआरसी संस्था राज्यातील सर्व जिल्हे व महापालिका क्षेत्रातील आरोग्य संस्थांचे व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामकाजाचे मूल्यांकन करते. तसेच त्यांचे कामगिरीवर आधारित गुणवतेनुसार दरमहा (रँकिंग) गुणानुक्रम देत असते. या रँकिंग प्रणालीमध्ये प्रशासकीय, तांत्रिक व वित्तीय बाबींचा समावेश असतो. यापुढे सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या बदली, बढती करताना, कामगिरीवर आधारित मूल्यांकन (रँकिंग) प्रणालीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्यमंत्री यांनी दिल्या आहेत. या निर्णयामुळे आरोग्य सेवेचे कामकाज अधिक पारदर्शक होईल. राज्यातील आरोग्य कार्यक्रम राबवण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध होत असतो. या निधीबरोबरच नागरिकांना आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देण्यासाठी 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सबीलिटी (सीएसआर)' माध्यमातूनही निधी उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विभागाने सीएसआर देणाऱ्या संस्थांना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत असलेले जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (डीपीएम) व जिल्हा लेखा व्यवस्थापक (डीएएम), एनएचएम सल्लागार व एनएचएम कार्यक्रम अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्थांना नियमित भेटी द्याव्यात. भेटीचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. असे निर्देश आरोग्यमंत्री आबिटकर यांनी दिले, यावेळी पदभरती, मानव संसाधन सुसूत्रीकरण, अधिकाऱ्यांनी भेटी दिलेल्या संस्थाच्या बाबतचे सादरीकरण करण्यात आले.

# एसपी अतुल कुलकर्णी यांनी घेतला जनता दरबार

## कौटुंबिक तक्रारींच्या निराकरण करणेसह १४३ अर्जांवर केली कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय, यांच्याकडुन सामान्य नागरिकांचे तक्रारीचे समक्ष निराकरण करण्यासाठी भव्य जनता दरबार तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले होते.



श्री. अतुल वि.कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या कल्पनेतुन सोलापूर ग्रामीण घटकाअंतर्गत येणा-या नागरिकांचे तक्रारांचे निराकरण करण्याकरीता सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील अलंकार हॉल पोलीस मुख्यालय येथे जनता दरबाराचे आयोजन केले होते. सकाळी १०.०० वा.ते संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत ग्रामीण भागातील तक्रारदार यांची समक्ष भेट घेण्याकरीता पोलीस प्रमुख श्री. अतुल वी कुलकर्णी स्वतः उपस्थित होते. पोलीस अधीक्षक यांनी उपस्थित नागरिकांच्या तक्रारी समोरा समोर ऐकून घेतल्या. नागरिकांच्या तक्रारीचे निरासन करण्यासाठी श्री. राहुल आत्राम सर, भापोसे परिविक्षाधीन पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेसह श्री. संकेत देवळेकर एस.डी.पी.ओ. सोलापूर उपविभाग, असे अधिकारी उपस्थित होते. उपस्थित नागरिकांच्या तक्रारीचे दखल घेवून जागीच निराकरण करण्याकरीता संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते, जनता दरबार दरम्यान ग्रामीण घटकातील महिलांच्या विषयीच्या तक्रारीचे निरसन करण्यासाठी भरोसा सेल, महिला शाखा देखील उपस्थित होते. महिलांच्या कौटुंबिक तक्रारींच्या निराकरण करणे दरम्यान सुमारे ६५ नागरिक उपस्थित होते.

जनता दरबार तक्रार निवारण दिन दरम्यान सुमारे ७८ नागरिकांनी आपल्या समस्या पोलीसांसमोर मांडल्या. सर्वांचे तक्रारीचे समाधान झाले. ज्यांच्या तक्रारीवर दखल घ्यायची आहे असे तक्रारदार यांची तक्रार संबंधित पोलीस ठाणेस वर्ग केले आहेत. तसेच जवळपास १४३ तक्रारी अर्जावरती कारवाई करुन निर्गती केली आहे. मा. पोलीस अधीक्षक, यांनी नागरिकांच्या तक्रारीकरीता विधी सेवेकरीता ॲड. श्री. शिवकैलास झुरळे, उपमुख्य लोकअभिरक्षक विधीसेवा प्राधिकरण सोलापूर यांना उपस्थित ठेवून नागरिकांना त्यांच्या तक्रारीबद्दल योग्य तो कायदेशीर सल्ला मिळण्यासाठी मार्गदर्शन होणेकरीता निमंत्रित केले होते. भरोसा सेल यांनी महिला तक्रारींचे निराकरण करीत असताना सुमारे एक वर्षापासून विभक्त असलेले महिला तिच्या माहेरच्या कुटुंबियासोबत हजर असताना सासरचे नातेवाईक यांचे योग्यते समुपदेशन करुन तिला सासरी नांदण्यास पाठविले.

# सर्व यंत्रणांच्या समन्वयातून सिंधुदुर्ग जिल्हा प्रथम क्रमांकावर नेणार : पालकमंत्री नितेश राणे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिंधुदुर्गनगरी : शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना तळागाळातील शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात सिंधुदुर्ग जिल्हा नेहमीच अग्रेसर राहिला असून, अनेक उपक्रमांत जिल्ह्याने प्रगतशील आणि उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हीच कामगिरी अधिक गतीने पुढे नेत सर्व यंत्रणांच्या समन्वयातून सिंधुदुर्ग जिल्ह्याला राज्यात नेहमी प्रथम क्रमांकावर आणणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री नितेश राणे यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत विकास कामांचा शुभारंभ व लोकर्पण तसेच वैयक्तिक लाभ वितरण व सन्मान सोहळा पालकमंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर, पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शीतल पुंड, जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष दळवी, प्रभाकर सावंत आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमुळे वैयक्तिक लाभार्थ्यांना थेट लाभ मिळत असून, त्याचबरोबर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होत आहे. या योजनांमुळे ग्रामीण भागातील नागरिक आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनत असून, विकासाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा विकासाच्या प्रत्येक निर्देशांकात पुढे राहील आणि राज्यात प्रथम क्रमांक मिळवेल, असा दृढ विश्वास व्यक्त करत पालकमंत्री राणे यांनी सर्व यंत्रणांना समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमधून ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे महत्वपूर्ण कार्य होत आहे. विविध क्षेत्रांत जिल्हा परिषदेने शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचवून शासनाच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीचा योग्य व पारदर्शक वापर करणे, वेळेत कामे पूर्ण करणे आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे यावर भर देण्याचे आवाहन पालकमंत्री नितेश राणे यांनी केले. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकारात्मक मानसिकतेने, लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श ठेवून काम केल्यास सिंधुदुर्ग जिल्ह्याचा सर्वांगीण विकास निश्चित साध्य होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत विकासकामांचा शुभारंभ व लोकर्पण**

पालकमंत्री राणे पुढे म्हणाले की, सिंधुदुर्ग जिल्हा हा एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) प्रणालीचा वापर करणारा पहिला जिल्हा ठरत आहे, ही अभिमानास्पद बाब आहे. जिल्हा परिषदेमार्फत एआयचा प्रभावी वापर करण्यात येत असल्यामुळे कामकाजात गती, अचूकता आणि पारदर्शकता वाढली असून, प्रत्यक्ष प्रगती स्पष्टपणे दिसून येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि परिणामकारक बनविण्याचा जिल्ह्याचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी नमूद केले. आज विविध योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या यशकथा समाजापर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. अशा यशकथांमुळे इतर नागरिकांनाही योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रेरणा मिळेल. योजनांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती होत असून, उत्पन्नात वाढ झाल्यामुळे भविष्यात जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात निश्चितच वाढ होईल, असा विश्वास पालकमंत्री राणे यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले की, जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून जनतेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करण्यात येत आहे. हा निधी शासनाचा नसून जनतेच्या हक्काचा आहे. त्यामुळे प्रत्येक रुपया जनतेच्या हितासाठी, पारदर्शक आणि प्रभावीपणे खर्च होणे आवश्यक आहे. शासनाच्या योजना आणि निधीचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचवा, हाच आमचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपण जनतेसाठी सदैव कार्यरत असल्याचे सांगत, पालकमंत्री या नात्याने सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत राहणार असल्याचा पुनरुच्चार केला. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या समन्वयातून सिंधुदुर्ग जिल्हा राज्यात विकासाचा आदर्श ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्य कार्यकारी अधिकारी खेबुडकर यांनी प्रास्ताविक केले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. परब यांनी आभार मानले.

यावेळी विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात आला. यावेळी लाड पागे समितीच्या शिफारशी नुसार १३ पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल चावी वाटप, आयुष्मान कार्ड धारकांना कार्डाचे वाटप, वैयक्तिक शौचालय प्रोत्साहन निधी वितरण, सेस अनुदानातून मागासवर्गीयांना शिलाई मशिन खरेदीसाठी अर्थसहाय्य, घरकुलासाठी अर्थसहाय्य असे विविध प्रकारचे सहाय्य देण्यात आले.

# विद्यार्थी बस पास विसरला; एस.टी.च्या वाहकाने उतरवले निर्मनुष्य ठिकाणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी : काका, पास घरी राहिला आहे माझ्या पप्पांना फोन करा, ते पैसे देतील' अशी कळकळीची विनंती करत असलेल्या पाचवी वर्गात शिकणार्या ऐका चिमुकल्याला एसटीचा पास विसरल्याने चक्क त्याला निर्मणूष्य ठिकाणी उतरवण्याचा महाप्रताप मंगळवेढा आगाराच्या कंडक्टरने केल्याचा प्रकार आसुन या घटनेची चौकशी करून संबधीत कंडक्टवर निलंबना सारखी कारवाईची मागणी पालकांनी केली आहे.

ब्रह्मपुरी (ता. मंगळवेढा) येथील प्रथमेश राहुल पाटील हा पाचवीतील विद्यार्थी रोज शिक्षणासाठी मंगळवेढ्याला ये-जा करतो. शनिवारी नेहमीप्रमाणे तो ब्रह्मपुरीहूण मंगळवेढा आगाराची सोलापूर-मंगळवेढा (बस क्रमांक ९४०५) या एसटीने प्रवास करत होता. ब्रह्मपुरीपासून ७ की.मी. अंतरावर बस आल्यानंतर वाहक तिकीट काढण्यासाठी आले यावेळी प्रथमेशने बॅगमध्ये पास शोधला असता, तो चुकून घरी राहिल्याचे लक्षात आले. घाबरलेल्या आवाजात त्याने वडिलांना फोन करण्याची विनंती केली. 'पप्पा पैसे देतील,' असे तो वारंवार सांगत होता. मात्र त्या निरागस शब्दांनाही वाहकाने किंमत दिली नाही. क्षणाचाही विचार न करता बसचा दरवाजा उघडून त्या चिमुकल्याला थेट माणववस्ती नसलेल्या काळ्या शिवारात माणूसकी विसरून त्या वाहाकाने थेट खाली उतरवले.पास जवळ नसला करी ऑडव्हाँनस् पैसे मुलाने भरलेच होते आशा प्रतिक्रीया या घटनेनंतर पालकांनी व्यक्त केल्या. आशा बेजबादार कर्मचार्यामूळे शासनाची एस.टी.मात्र बदनाम होत आहे. अचानक रस्त्यावर सोडल्यामुळे प्रथमेश गोंधळून गेला. डोळ्यांत पाणी व मनात भीती आणि आजूबाजूला निर्मणूष्य वस्ती अखेर त्याने रस्त्यावरून जाणाऱ्या एका दुचाकीस्वाराला हात दाखवला. त्या व्यक्तीच्या मदतीने तो कसेबसे घरी पोहोचला. घरी आल्यानंतर त्याच्या थरथरत्या आवाजात घडलेला प्रकार ऐकून पालक कुटुंबीय हादरून गेले.

या घटनेनंतर पालकांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. पास विसरणे ही चूक असू शकते; पण त्यासाठी लहानग्या विद्यार्थ्याला आडराणात उतरवणे म्हणजे त्याच्या जीवाशी खेळ आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. या प्रकरणी पालक राहुल पाटील यांनी परिवहन मंत्री, परिवहन आयुक्त, जिल्हा आगार प्रमुख व तालुका आगार व्यवस्थापकांकडे लेखी तक्रार दाखल करून संबंधित वाहकावर निलंबनाची कारवाईची मागणी केली आहे.




अशा घटनांमुळे संपूर्ण एसटी महामंडळाच्या विश्वासार्हतेचे नुकसान होत आहे. आता केवळ चौकशी नव्हे, तर धडा शिकवणारी कठोर कारवाईच आवश्यक असल्याची तीव्र भावणा नागरिकांतून व्यक्त होत होत आहेत.

**श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुवर्णकलशारोहण समारंभ**

# श्री संत वामनभाऊ महाराजांचे विचार पिढ्या न पिढ्या मार्गदर्शक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड : समाजाला अध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे नाथ परंपरेतील महान श्री संत वामनभाऊ महाराज यांचे विचार काळाच्या ओघातही अधिकच सुसंगत ठरत असून, त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश पिढ्या न पिढ्या समाजाला मार्गदर्शन करत राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज, आमदार धनंजय मुंडे, सुरेश धस, मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, भीमराव धोंडे, विक्रमानंद शास्त्री, स्वामी विश्वेश्वरानंदजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, श्री संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी मी येथे आलो आहे. हे निमंत्रण मुख्यमंत्र्याला नसून, श्री संत वामनभाऊ महाराजांच्या एका भक्ताला आणि गहिनीनाथ गडाच्या सेवकाला विठ्ठल महाराजांनी दिलेले आहे, या भावनेतून मी येथे उपस्थित आहे.

नाथ परंपरेतील महान संत आणि शंकराचा अवतार मानले जाणारे श्री संत वामनभाऊ महाराज हे समाजाला दिशा देणारे सद्गुरु होते. दऱ्याखोऱ्यांतून प्रवास करत त्यांनी भागवत पंथाचा प्रचार केला आणि समाजात एकोप्याचा संदेश दिला. मन शुद्ध असेल तर आचरण शुद्ध होते हा विचार त्यांनी समाजमनात रुजवला. त्यांच्या उपदेशामुळे चोरसुद्धा चोरी सोडून माळकरी झाले, ही त्यांची अलौकिक किमया होती, असे त्यांनी सांगितले.

श्री संत वामनभाऊ महाराजांना वाचासिद्धी होती, असे सांगितले जाते. त्यांच्या कीर्तनातून आणि विचारातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अध्यात्म पोहोचले. कितीही पिढ्या बदलल्या तरी त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

प्रसाद वितरणाची परंपरा हे श्री संत वामनभाऊ महाराजांचे मोठे वैशिष्ट्य असून, जिथे-जिथे सप्ताह होतो तिथे भाविकांसाठी पोटभर जेवणाची व्यवस्था केली जाते. पुढील सप्ताहासाठी विविध गावांतून मोठ्या प्रमाणावर मागणी असणे ही श्री संत वामनभाऊ महाराजांच्या कृपेची साक्ष असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी शासनाच्या योजनेअंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली असून ती टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत.

पंढरपूर येथे आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पालखी मार्गाच्या विकासासाठीही लवकरच काम करण्यात येईल, असे आश्वासन देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथ गडाचा एक अनुयायी म्हणून येथील सर्व विकासकामांची जबाबदारी लोकप्रतिनिधींसह मिळून पार पाडली जाईल. दरवर्षी संधी मिळेल तेव्हा गहिनीनाथ गडावर येऊन श्री संत वामनभाऊ महाराजांचा आशीर्वाद घेत राहीन, असे मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, श्री संत वामनभाऊ महाराजांनी कठीण काळात माणसाला माणूस बनवण्याचे संस्कार समाजाला दिले. सत्य, एकोपे आणि सेवाभावाचे हे संस्कार आजही महाराष्ट्रभर जिवंत आहेत. कष्टकरी, गरीब आणि वंचित समाज श्री संत वामनभाऊ महाराजांचे विचार विसरलेला नाही.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथ गडाच्या विकासाला भव्य स्वरूप मिळत असून, हे कार्य भाविकांच्या श्रद्धेला साजेसे ठरत आहे. सामान्य माणसाच्या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी केलेले हे कार्य निश्चितच लोकांचा आशीर्वाद मिळवून देणारे आहे असा उल्लेख त्यांनी केला. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.